**ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003**

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE - 560 003**

**ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಜೂನ್ — 2014**

**S. S. L. C. EXAMINATION, JUNE — 2014**

**ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು**

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 17. 06. 2014 — **ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

Date : 17. 06. 2014 — **Code No. : 08-M**

ವಿಷಯ : **ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ**

## Subject : First Language — MARATHI

**[ ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 125**

**[ Max. Marks : 125**

| प्रश्न क्रमांक | | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|---|
| I. | | पर्यायातील अचुक उत्तरे ( बरोबर उत्तरास 1 मार्क द्यावे ) : | 15 × 1 = 15 |
| 1. | (A) | दर्शनासाठी | 1 |
| 2. | (B) | बाला जरठ विवाह | 1 |
| 3. | (D) | अंगात संचारल्या सारखा | 1 |
| 4. | (A) | सदाबहार | 1 |
| 5. | (C) | लिंब | 1 |
| 6. | (B) | रायगड | 1 |
| 7. | (C) | मगरीच्या पिलासारखा | 1 |
| 8. | (A) | प्रवरा | 1 |
| 9. | (B) | मैना | 1 |
| 10. | (A) | सकाळी | 1 |
| 11. | (C) | आनन | 1 |
| 12. | (B) | उद्‍गार वाचक | 1 |
| 13. | (C) | भावे | 1 |
| 14. | (C) | पंचमी | 1 |
| 15. | (B) | चालू वर्तमान | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| II. | रिकाम्या जागी योग्य शब्द ( अचूक उत्तरास 1 गुण देणे ) : | 5 × 1 = 5 |
| 16. | शेंगदाण्याची | 1 |
| 17. | रविवारी | 1 |
| 18. | आर्या | 1 |
| 19. | दांभिकतेची चीड | 1 |
| 20. | काकडीला | 1 |
| III. 21. | योग्य जोड्या ( बरोबर उत्तरास 1 गुण द्यावा ) : | 5 × 1 = 5 |
| | (i) (ई) पोपटी चौकट | 1 |
| | (ii) (ए) सांजवारा | 1 |
| | (iii) (अ) माती पंख आणि आकाश | 1 |
| | (iv) (आ) श्रावण मेघ | 1 |
| | (v) (ऊ) झेंडूची फुले | 1 |
| IV. | एका वाक्यातील उत्तरे ( बरोबर उत्तरास 1 गुण द्यावा ) | 10 × 1 = 10 |
| 22. | बाईदेवबास हे नेवासे या ठिकाणी राहणारे होते. | 1 |
| 23. | आजी शरण येते या कथेतील पोस्टमन त्यांचा नातू पंप्या उर्फ राजा हा होय. | 1 |
| 24. | मिलो, मका, गहू, डाळ, पीठ, काही रक्कम कोरड्या भिक्षेत मिळे. | 1 |
| 25. | शालेय जीवनात लेखक ( ज्ञानेश्वर मुळे ) म० फुले व डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानी भारले होते. | 1 |
| 26. | श्री कृष्ण हा खोडकर होता. त्याच्या बद्दल गवळणींकडून तक्रार यशोदे कडे येत. म्हणून श्रीकृष्णाला शिक्षा केली. | 1 |
| 27. | आम्ही कोण कवितेतील कवी परभाषेतील वाङमयाची भाषांतरे करतात. | 1 |
| 28. | जनीच्या दारातील तुळशीच्या मंजिरीला शेल अडकलेला ( गुंतलेला ) पाहून तेथे असल्याचे कळले. | 1 |
| 29. | सत्तांतर या माकडाच्या जीवनाचा अभ्यास करणाऱ्या पुस्तकाचे लेखक 'व्यंकटेश माडगूळकर' हे आहेत. | 1 |
| 30. | कृतज्ञ. | 1 |
| 31. | नामा ऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दाला सर्वनाम म्हणतात. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| V. | दोन-तीन वाक्यातील उत्तरे ( मुद्दे ) : | 15 × 2 = 30 |
| 32. | पानिपतची तिसरी लढ़ाई 1761 मध्ये झाली. ही लढ़ाई मराठे व अहमदशाह अब्दाली यांच्यात झाली. | 2 |
| 33. | त्यास नींद्य मानत. जाती बहिष्कृत करत. जेथे राहत तेथे त्याचे खूप हाल होत. त्याचे लग्नकार्य होत नसे. कोणी त्याच्याकडे जेवायला जात नसे. | 2 |
| 34. | जशी जन्माला घातलीस तसे या जगातून मला नाहीशी कर; माझी मान चिरुन टाक, किंवा मला विष पाज. मुलीचे दु:ख निवारण जी माता करत नाही, ती तिचा दुश्मन असते. | 2 |
| 35. | किरकोळ अंगाचा, डोक्यावर गांधी टोपी, अंगात सफेद नेहरु शर्ट, शर्टाच्या खिशात मोठ पेन, पायजमा घातलेला. दोन्ही हातात दोन भल्या मोठ्या पिशव्या होत्या. | 2 |
| 36. | टाकळीतल्या प्रत्येक घरातील एकाद दुसरा माणूस सैन्यात आहे. गावात मुलांची विधवा तरुण स्त्रियांची संख्या जास्त आहे. टाकळीने देशप्रेमाचा आदर्श घालून दिला आहे. | 2 |
| 37. | सावळ्या रंगाची, विस्कटलेल्या केसाची, मळका फाटका झगा घातलेली, हरिणी सारख्या डोळ्याची; सावळ्या रंगामुळे अधिक उठून दिसणाऱ्या पांढऱ्या दाताची सात-आठ वर्षाची मुलगी असे वर्णन केले आहे. | 2 |
| 38. | विठ्ठल सावळा सुंदर आहे. त्याचे रूप मनोहर आहे. त्याने कमरेला पितांबर नेसले आहे. गळ्यात वैजंयती माळा शोभून दिसतात. त्याने मला काया, वाचा, मने आपलेसे केले आहे. | 2 |
| 39. | राजाला सर्वच बाजूनी सावध राहावे लागते. आप्त स्वकीयांच्या यादवीला पायबंद घालावा लागतो. परकिय शत्रुच्या आक्रमणाला तोंड द्यावे लागते. कारभारी सैन्य दल यांची मने धरावी लागतात. जनहिताचा विचार करावा लगतो. | 2 |
| 40. | काळाला यम असे ही म्हणतात. तो गरगर फिरतो. त्याच्या हातात कठिण पाश आहेत. तो केंव्हा व कोणावर घाला घालील याचा नेम नाही. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 41. | राजाने वनमालेला घरी येण्याची विनंती केल्यावर ती म्हणते, सकाळी व सायंकाळी पानावर पडणारे दवं मोत्या सारखे दिसते, पण स्पर्श केला ते गळून पडते. तसे माझे सौंदर्य मुक्त वातावरणातील वनातच खुळून दिसेल. तुझ्या वाड्यात ते कोमेजेल. असे उत्तर देते. | 2 |
| 42. | रुक्मिणी नटून थटून विठ्ठलाची वाट पाहत रंगमहालात बसली आहे. तिने गुलाबी रंगाची आरसे लावलेली चोळी व निळी पैठण परिधान केले आहे. तिचे रूप चंद्रकोरी सारखे सुंदर दिसते व प्रेमाला कस्तुरी सुगंध येतो. | 2 |
| 43. | जातीपातीचे शिक्के नसावेत. स्वच्छंदी राहता यावे. सत्ता, स्पर्धा, हेवेदावे, भांडणे असू नयेत. हे दुर्गुण जाऊन एका निस्वार्थी जगाची कल्पना कवीने केली आहे. | 2 |
| 44. | येथे श्लेष अलंकार आहे. अलंकाराने नांव 1<br>व्याख्या 1<br>जेंव्हा एका शब्दाचे दोन किंवा अधिक अर्थ होतात तेंव्हा श्लेष अलंकार होतो.<br>अर्थ — जावयाची-जाणार. जावयाची-मुलीच्या नवऱ्याची. | 2 |
| 45. | हो णा र \| जो व र \| त दी य \| वि यो ग \| हा ही<br>– – ≈ \| – ≈ ≈ \| ≈ – ≈ \| ≈ – ≈ \| – –<br>त \| भ \| ज \| ज \| ग ग<br>वृताचे नांव 1<br>गण 1<br>वृत्ताचे नाव — वसंत तिलका. अक्षरे — 14<br>गण त, भ, ज, ज, ग ग. यती 6 व्या अक्षरावर. | 2 |
| 46. | संधी — विग्रह — नाव<br>i) दुष्कृत्य — दुः + कृत्य — विसर्ग संधी<br>ii) जगन्नाथ — जगत् + नाथ — व्यंजन संधी.<br>विग्रह 1<br>नांव 1 | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VI. | पाच-सहा वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : | 10 × 3 = 30 |
| 47. | **संदर्भ :** | |
| | i) वरील वाक्य पाखर मायेचा वटवृक्ष या पाठातील आहे. संदर्भ $1\frac{1}{2}$ स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$ | 3 |
| | ii) याचे लेखक मारुती चितमपल्ली असून या पाठाचे मूल्य वृक्षप्रेम, पर्यावरणाचे रक्षण हे आहे. | |
| | iii) हे वाक्य लेखकाने वाचकाना म्हटले आहे. | |
| | **स्पष्टीकरण** — पक्षी निरीक्षणातून वडाच्या झाडाची थोखी कवीने सांगितली आहे. वटवृक्ष पक्षांना आश्रय देतो. तसेच अन्न ही देतो. येथे वेगवेगळ्या रंगाचे, आकाराचे, जातीचे पक्षी आश्रय घेतात त्याच्यावर तो मायेची पाखर घालतो. | |
| 48. | मराठी भाषेच्या जन्मकाळी राष्ट्रकूट या कन्नड घराण्याची सत्ता होती. त्यामुळे बरेच कन्नड शब्द मराठीत रुढ झाले आहेत. नात्यागोत्याचे अनेक शब्द कन्नड वरुन आले आहेत. आई, ताई आण्णा आप्पा काका हे मूळचे कन्नडचे शब्द आहेत पण मराठीने वेगळेपणा जपला आहे. कन्नडमधे आई म्हणजे आजी, तर मराठीत आई म्हणजे माता. कन्नड मध्ये ताई म्हणजे माता, मराठीत ताई म्हणजे बहिण. कन्नड मध्ये थोरल्या भावाला आण्णा म्हणतात. तर पिता या अर्थाने आप्पा शब्द येतो. | |
| | तूप, कडबू, पुरणपोळी हे कन्नड मधून मराठीत आले. अडकी म्हणजे सुपारी मराठीत पैसा अडका शब्दाने स्विकारला आहे. | 3 |
| 49. | प्रत्येक ऋतूत भिंत वेगवेगळी दिसते. वसंतात ती हिरवी दिसते म्हणजे वसंत हिरव्या रंगात बुडवितो. ग्रीष्मात ती शुद्ध सोनेरी दिसते अर्थात कोरडी हिरवळपणा नसलेली दिसते. शरद ऋतूच्या चांदण्यात रुपेरी ( चंदेरी ) दिसते शरद तिला रौप्य रसात डुंबवतो आणि शिशिरात बर्फाच्छादित असते अर्थात ती बर्फाने आच्छादलेली असते. बर्फाची धवल ( पांढरी ) फुले तिच्यावर पडतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 50. | डॉ० माशेलकरांची नवपंचशीले<br>i) मानव केंद्रीत विकास<br>ii) विद्यार्थी केंद्रित शिक्षण<br>iii) स्त्री केंद्रीत कुटुंब<br>iv) ज्ञानावर आधारीत समाज निर्मिती<br>v) नवनिर्मितीवर भर देणारा भारत. | 3 |
| 51. | पुरुषाचे रूप म्हणजे विद्या. विद्या ही न दिसणारी संपती आहे. ती परदेशात भावाप्रमाणे असते. विद्या राजाला प्रिय आहे. विद्येशिवाय मनुष्य म्हणजे पशू होय. मान्यवर ही विद्येला मानतात. तिची पूजा करतात. | 3 |
| 52. | श्रीरामाचे ती अश्रुंनी पाय धूते. त्यांच्या स्मरणात झिजवलेल्या देहाचे चंदन लावते. रोमांचषी फुले अर्पण करते. नीज ज्ञानाच्या दिव्यानी ओवाळते. नैवेद्या करिता उष्टी बोरे देते. तिची भक्ती आत्मनिवेदन भक्ती आहे. | 3 |
| 53. | आई मोळी आणण्यासाठी गेली असता, तिला साप चावाला; पाय बांधून ती घरी आली. बरोबर गेलेल्या बायानी साप चावल्याचे सांगितले. गंडे झाले. मंत्रोपचार झाला. वैद्याने औषध दिले, पण त्याचा कांहीही उपयोग झाला नाही. आई अखेर मरण पावली. | 3 |
| 54. | संदर्भ : संदर्भ $1\frac{1}{2}$<br>i) वरील ओळ 'संवाद' या कवितेतील आहे.<br>ii) याचे कवी निरंजन उजगरे हे असून याचे मूल्य निसर्ग प्रेम हे आहे.<br>iii) स्पष्टीकरण : हे वाक्य बंगल्याने पावसाला म्हटले आहे. स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>मोठ्या पावसात बंगला कोसळला. पावसाला ही खेद वाटला. त्यावेळी पाऊस ''माझ्या मनात तुला कोसळवायच नव्हत.'' असे म्हणाला. त्यावेळी बंगल्याने म्हटले की ''मी आधीच माणसातून कोसळलो होतो''. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 55. | वाक्प्रचारांचा अर्थ : अर्थ $\frac{1}{2}$ वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$ | |
| | i) स्तंभित होणे — आश्चर्यचकीत होणे | |
| | ii) पोटावर पाय देणे : उपजिविकेचे साधन नष्ट करणे | |
| | iii) लहान तोंडी मोठा घास घ्येणे — लहानानी मोठ्याना शहाणपण शिकविणे. $3 \times 1 =$ | 3 |
| 56. | समासाचा विग्रह विग्रह $\frac{1}{2}$ ओळखणे $\frac{1}{2}$ | |
| | समास — विग्रह — नाव | |
| | i) युद्ध सामुग्री — युद्धाची सामुग्री — षष्ठी तत्पुरुष | |
| | ii) आई बाप — आई आणि बाप — द्वंद्व | |
| | iii) पानोपानी — प्रत्येक पानावर — अव्ययीभाव $3 \times 1 =$ | 3 |
| VII. | सात-आठ वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : | $4 \times 4 = 16$ |
| 57. | मुलाला योग्य वेळी उपचार न मिळाल्याने रक्तस्त्राव होऊन तो वेडा बनला. एक हात व एक पाय कापावा लागला. बाई साहेब मुक बनल्या. प्रवीर बाबूंच्या डोक्यावरही परिणाम झाला. प्रापंचिक जीवन उध्वस्त झाले. | 4 |
| 58. | 'विपश्यना' अतिशय पुरातन भारतीय पद्धत. याचे मुख्य उद्दिष्ठ चित्त शुद्धी. हे धर्मातीत तंत्र आहे. माणसाच्या दृष्टीकोनात अमुलाग्र बदल घडू शकतो. याचे 10 दिवसाचे शिबीर असते. त्यावेळी मौन पाळावे लागते. श्वासोच्छ्वासा वर नियंत्रण करण्यास शिकविले जाते. 8 तास ध्यान करावे लागते. <br><br> गुन्हेगारानी आपले गुन्हे कबूल केले व चूक कबूल केल्याचा उच्च कोटीचा आनंद मिळाला असे कबूल केले व प्रोधर व रामसिंग याची माफी मागितली कारण सुरवातीला त्यांनी प्रोधर व रामसिंग याना त्रास दिला होता. | 4 |
| 59. | गोरगरीबांना छळू नका. फुकटचे खाऊ नका. स्वातंत्र्यासाठी बलिदान केलेल्याना विसरु नका. काळोखाची पूजा करु नका. नुसते पुतळे उभारण्यापेक्षा त्यांचा आदर्श जपा. भ्रष्टाचार म्हणून बडबडत बसू नका. अज्ञानाची पूजा करु नका. स्त्रीला समान मानव माना, दासी म्हणून मारु नका, देवी म्हणून पूजू नका. परभाषा शिका पण मातृभाषेला तुच्छ लेखू नका. माणूसकीत देव पहा. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 60. | कविता ( शुद्धता पहा असेच असावे ) | |
| | भल्या सकालला आबाल झुकतं हे खाली | |
| | सोनं चमचमतंय दर्याला चढते लाली | |
| | आमी पान्यामंदी रापण टाकतो जाली | 4 |
| | धन दर्याचं लुटून भरतो डाली । | |
| 61. | उताऱ्या वरील प्रश्नांची उत्तरे ( प्रत्येकी 1 मार्क ) : | 4 × 1 = 4 |
| | (i) विज्ञानातील अणूशक्ती अन्न वस्त्र निवाऱ्याच्या उत्पादना साठी वापरली जावी. | 1 |
| | (ii) रासायनिक कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या काळ्या पिवळ्या विषारी वायूमुळे वातावरण विषारी बनते. | 1 |
| | (iii) मानवाचे आरोग्य वृक्ष वेलीत चांगले राहू शकते. | 1 |
| | (iv) विज्ञानाचा वापर समतोल बुद्धिने, शांत मनाने व विचारपूर्वक करावा. | 1 |
| 62. | पत्र लेखन : | 5 |
| | (i) पत्र लेखकाचा पत्ता तारखे सह ( प्रेषक ) | 1 |
| | (ii) मायना | 1 |
| | (iii) मजकूर | 1 |
| | (iv) भाषा शैली ( आकर्षक ) | 1 |
| | (v) शेवट कोणाला पत्र पाठवले त्याच्या पत्त्यासह । | 1 |
| 63. | निबंध लेखन : | 5 |
| | (i) प्रस्तावना | 1 |
| | (ii) विषय ज्ञान | 1 |
| | (iii) भाषा अलंकारीकता | 1 |
| | (iv) शुद्धता | 1 |
| | (v) समारोप ( शेवट ) | 1 |